# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{ स.वि.वि }**

नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन 2025-26 या आर्थीक वर्षात वैयक्तिकरित्या अल्प-आय गटातील गरीब, गरजु, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत महिलाना तसेच सामुहीकरित्या महिला बचत गटाना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातुन पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहुन शिवण यंत्र प्रशिक्षण प्रमाणपत्र प्राप्त महिलाना शिवणयंत्र वाटप करण्याचे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेण्याबाबत.

**अटि व शर्ती :-**

1) शिवणयंत्र मागणीबाबतचा अर्जदार महिलेचा एक अर्ज सादर करावा.
2) बी.पी.एल. प्रमाणपत्र किंवा पिवळी शिधापत्रिका किंवा प्राधान्यक्रम असलेली शिधापत्रिका सादर करने आवश्यक राहील.
3) अर्जदार महिलेचे आधार कार्ड आवश्यक आहे.
4) अर्जदार महिलेचे स्वत:च्या नावाची बँक पास बुकची झेरॉक्स प्रत जोडावी.
5) उत्पन्न प्रमाणपत्र (उत्पन्न प्रमाणपत्र रु. 1 लक्ष व त्यापेक्षा कमी असने आवश्यक राहील.)
6) इलेक्ट्रिक बिल व 2 पासपोर्ट फोटो जोडावे.
7) प्रतिज्ञापत्र (याआधी कुठल्याही शासकीय शिवणयंत्र योजनेचा लाभ घेतला नसल्याचे व कोणत्याही शासकीय/ निमशासकीय सेवेत नोकरी करित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.)
8) नागपूर शहरात रहिवासी असल्याचे रहिवासी प्रमाणपत्र जोडने आवश्यक राहील.
9) शासकीय, निमशासकीय किंवा इतर शिवणयंत्राचे प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडून शिवणयंत्राचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
10) महिला बचत गट DAY – NULM पोर्टलवर नोंदणीकृत असावा. एका महिला बचत गटास एकदा शिवणयंत्राचा लाभ दिल्यानंतर दुबार लाभ देता येणार नाही.
11) गटातील सदस्य विधवा, परित्यक्ता, एकल महिला असल्यास शिवणयंत्र देण्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल, नसल्यास गटातील साधारण महिला सदस्यास सुध्दा शिवणयंत्र देता येईल. तथापि याकरिता ज्या गटातील महिला सदस्येस लाभ द्यावयाच्या आहे त्यांना योजनेचा लाभ देण्याचा गटाचा ठराव आवश्यक राहील.
12) महिला बचत गटातील एक सदस्यास शिवणयंत्र देण्यात येईल.
13) अर्जदार महिलेचे वय 18 ते 55 वर्ष इतके आवश्यक राहील (जन्माचा दाखला / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.)
14) एका झोनमधून आवश्यकतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास व ते निकषाप्रमाणे पात्र ठरल्यास त्यांची निवड ईश्वर चिठ्ठीद्वारे करण्यात येईल.
15) एखादया झोन मधून आवश्यकतेनुसार अर्ज प्राप्त न झाल्यास शिल्लक लाभार्थी प्रमाण इतर झोनमध्ये अधिक प्राप्त झालेल्या अर्जामध्ये समायोजित करण्यात येईल.
16) पात्र महिला लाभार्थ्यांना स्वत: शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशीद्वारे खातर जमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर देण्यात येईल.

सन 2025 - 26 या आर्थीक वर्षात एका शिवणयंत्राची किंमत रु. 8,500/- निश्चित करण्यात आली असुन प्रति झोन लाभार्थी 23 (12 बचत गट, 11 वैयक्तिक) प्रमाणे 10 झोन मधुन 230 (लाभार्थी) x रु. 8,500/- = रु. 19,55,000/- (अक्षरी रु. एकोनविस लक्ष पंचावन्न हजार रुपये

फक्त) आणि योजनेचे बॅनर, पत्र व्यवहाराकरिता पोस्टेज खर्च इ. असा एकूण रु. 20.00 लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

मनपाच्या 10 झोन मधुन प्रत्येक झोन निहाय 50 टक्के वैयक्तिक व 50 टक्के महिला बचत गटास निकषाच्या अधिन राहुन शिवणयंत्राचा लाभ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापि झोन मधून गटाचे व वैयक्तीकरित्या कमी-अधिक अर्ज प्राप्त झाल्यास झोन अंतर्गत वाटप करण्यात येणाऱ्या शिवणयंत्राचे संख्येनुसार समायोजीत करुन शिवणयंत्र वाटप करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. डीसीटी 2316/ प्र. क्र. 133 का/ 1417, दि. 05/12/2016 अन्वये महिला लाभार्थ्यांनी शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशी अंती खातरजमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर लाभार्थ्यांचे बॅक खात्यावर जमा करण्यात येईल.

सबब, शिवणयंत्र वाटप योजना राबविण्याकरिता महिला व बाल कल्याणच्या पद क्रमांक (A 27002441601) मधुन करण्याकरीता येणारा अपेक्षीत खर्च रु 20,00,000/- (अक्षरी वीस लक्ष) खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे ठराव मान्यतेस सादर.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 216/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 04/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (सविवि), समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन 2025-26 या आर्थीक वर्षात वैयक्तिकरित्या अल्प-आय गटातील गरीब, गरजु, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत महिलाना तसेच सामुहीकरित्या महिला बचत गटाना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातुन पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहुन शिवण यंत्र प्रशिक्षण प्रमाणपत्र प्राप्त महिलाना शिवणयंत्र वाटप करण्याचे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेण्याबाबत.

**अटि व शर्ती :-**

1) शिवणयंत्र मागणीबाबतचा अर्जदार महिलेचा एक अर्ज सादर करावा.
2) बी.पी.एल. प्रमाणपत्र किंवा पिवळी शिधापत्रिका किंवा प्राधान्यक्रम असलेली शिधापत्रिका सादर करने आवश्यक राहील.
3) अर्जदार महिलेचे आधार कार्ड आवश्यक आहे.
4) अर्जदार महिलेचे स्वत:च्या नावाची बँक पास बुकची झेरॉक्स प्रत जोडावी.
5) उत्पन्न प्रमाणपत्र (उत्पन्न प्रमाणपत्र रु. 1 लक्ष व त्यापेक्षा कमी असने आवश्यक राहील.)
6) इलेक्ट्रिक बिल व 2 पासपोर्ट फोटो जोडावे.
7) प्रतिज्ञापत्र (याआधी कुठल्याही शासकीय शिवणयंत्र योजनेचा लाभ घेतला नसल्याचे व कोणत्याही शासकीय/ निमशासकीय सेवेत नोकरी करित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.)
8) नागपूर शहरात रहिवासी असल्याचे रहिवासी प्रमाणपत्र जोडने आवश्यक राहील.
9) शासकीय, निमशासकीय किंवा इतर शिवणयंत्राचे प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडून शिवणयंत्राचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
10) महिला बचत गट DAY – NULM पोर्टलवर नोंदणीकृत असावा. एका महिला बचत गटास एकदा शिवणयंत्राचा लाभ दिल्यानंतर दुबार लाभ देता येणार नाही.

11) गटातील सदस्य विधवा, परित्यक्ता, एकल महिला असल्यास शिवणयंत्र देण्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल, नसल्यास गटातील साधारण महिला सदस्यास सुध्दा शिवणयंत्र देता येईल. तथापि याकरिता ज्या गटातील महिला सदस्येस लाभ द्यावयाच्या आहे त्यांना योजनेचा लाभ देण्याचा गटाचा ठराव आवश्यक राहील.

12) महिला बचत गटातील एक सदस्यास शिवणयंत्र देण्यात येईल.

13) अर्जदार महिलेचे वय 18 ते 55 वर्ष इतके आवश्यक राहील (जन्माचा दाखला / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.)

14) एका झोनमधून आवश्यकतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास व ते निकषाप्रमाणे पात्र ठरल्यास त्यांची निवड ईश्वर चिठ्ठीद्वारे करण्यात येईल.

15) एखादया झोन मधून आवश्यकतेनुसार अर्ज प्राप्त न झाल्यास शिल्लक लाभार्थी प्रमाण इतर झोनमध्ये अधिक प्राप्त झालेल्या अर्जामध्ये समायोजित करण्यात येईल.

16) पात्र महिला लाभार्थ्यांना स्वत: शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशीद्वारे खातर जमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर देण्यात येईल.

सन 2025 - 26 या आर्थीक वर्षात एका शिवणयंत्राची किंमत रु. 8,500/- निश्चित करण्यात आली असुन प्रति झोन लाभार्थी 23 (12 बचत गट, 11 वैयक्तिक) प्रमाणे 10 झोन मधुन 230 (लाभार्थी) x रु. 8,500/- = रु. 19,55,000/- (अक्षरी रु. एकोनविस लक्ष पंचावन्न हजार रुपये फक्त) आणि योजनेचे बॅनर, पत्र व्यवहाराकरिता पोस्टेज खर्च इ. असा एकूण रु. 20.00 लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

मनपाच्या 10 झोन मधुन प्रत्येक झोन निहाय 50 टक्के वैयक्तिक व 50 टक्के महिला बचत गटास निकषाच्या अधिन राहुन शिवणयंत्राचा लाभ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापि झोन मधून गटाचे व वैयक्तीकरित्या कमी-अधिक अर्ज प्राप्त झाल्यास झोन अंतर्गत वाटप करण्यात येणाऱ्या शिवणयंत्राचे संख्येनुसार समायोजीत करुन शिवणयंत्र वाटप करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. डीसीटी 2316/ प्र. क्र. 133 का/ 1417, दि. 05/12/2016 अन्वये महिला लाभार्थ्यांनी शिवणयंत्र खरेदी केल्याचे देयक सादर केल्यानंतर मौका चौकशी अंती खातरजमा करुन अनुदानाचा लाभ DBT तत्वावर लाभार्थ्यांचे बॅक खात्यावर जमा करण्यात येईल.

सबब, शिवणयंत्र वाटप योजना राबविण्याकरिता महिला व बाल कल्याणच्या पद क्रमांक (A 27002441601) मधुन करण्याकरीता येणारा अपेक्षीत खर्च रु 20,00,000/- (अक्षरी वीस लक्ष) खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.